International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 12 No.2 Nov-Dec 2024

# फिनटेक : बँकिंग क्षेत्रातील भरारी

**Dr.Dinesh Yadavrao Parkhe**
Head dept. of Economics, PatpanhaleArts,Commerce and Science College
Tal-Guhagar Dist-Ratnagiri.
**Corresponding Author: Dr.Dinesh Yadavrao Parkhe**
**Email:** dinesh.parakhe@gmail.com
**DOI- 10.5281/zenodo.14408778**

**सारांश:**

भारताच्या यांत्रिकदृष्ट्या सद्य परिस्थितीचा आढावा घेतला तर असे लक्षात येतेकी, डिजिटल पेमेंट,डिजिटल कर्ज,बँक टेक्नोलॉजी,इन्शुरन्स टेक्नोलॉजी,क्रिपटोकरन्सी हि सर्व फिनटेक टेक्नोलॉजीमध्ये समाविष्ट असणारी प्रमुख क्षेत्रे आहेत. याशिवाय फिनटेक अंतर्गत शिक्षण,रिटेल बँकिंग,निधी उभारणी आणि ना नफा या तत्वावरील कार्य गुंतवणूक व्यवस्थापन अशी अनेक क्षेत्रे समाविष्ट आहेत.संगणकाचे युग भारतीय बँकिंग कार्यव्यवस्थेत आणले गेले यामुळे कामाचे स्वरूप बदलून बँकिंग क्षेत्र बदलास त्यांना चालना मिळाली याचाच धागा पकडून फिनटेक तंत्र प्रणालीने आर्थिक व्यवस्थेला व्यापक स्वरूप प्राप्त करून दिले झपाट्याने बदलून जाणाऱ्या भारतीय अर्थव्यवस्थेला जागतिक आर्थिक स्पर्धेत आपल अस्तित्व टिकवून ठेवण्याची किंबहुना आर्थिक दृष्ट्या सक्षम आणि प्रबळ बनविण्याची क्षमता प्रस्तापित करता येते.येथील **"बाजारपेठांमध्ये आर्थिक उत्पादने किवा सेवा प्रदान करण्यासाठी वापरले जाणारे तंत्रज्ञान म्हणजे फिनटेक होय".** फिनटेक कंपन्या वित्तीय सेवांशी संबधित कार्य करतात यामुळे ग्राहकांना आर्थिक व्यवहार करणे,आर्थिक व्यवहारासंबंधी सेवा जलद व पारदर्शी मिळण्यास सुलभ होते.फिन्टेकची हि उत्तुंग भरारी भावी अर्थव्यवस्थेची भांडवल सूचक मोठी झेप आहे असे म्हणता येईल.

**मुख्य शब्द:** तंत्रज्ञान, बँक, डिजिटल विमा, ॲप्स

**प्रस्तावना:**

भारतीय बँकिंग कार्य व्यवस्थेत संगणकाचे युग आणले गेले.त्यामुळे बँकिंग क्षेत्रातील कामाचे स्वरूप बदलून नवीन दिशेला चालना मिळाली याचाच धागा पकडून फिनटेक तंत्रज्ञानाने आर्थिक व्यवस्थेला व्यापक स्वरूप प्राप्त करून दिले. झपाट्याने बदलत जाणाऱ्या भारतीय अर्थव्यवस्थेला जागतिक आर्थिक स्पर्धेत आपले अस्तित्व टिकवून ठेवण्याबरोबरच आर्थिक दृष्ट्या सक्षम आणि प्रबळ बनवण्याची क्षमता प्रस्थापित करता येते.अर्थव्यवस्थेतील सर्वच क्षेत्राला आधुनिक बदलाशी सामोरे जाण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर करण्याशिवाय तरणोपाय नाही. अलीकडील काळात असे कोणतेच क्षेत्र उरले नाही कि जिथे तंत्रज्ञानाचा वापर होत नाही.तंत्रज्ञानाचा वापर करणे हि काळाची गरज बनली आहे. वेळेची बचत,कामाचा दर्जा सुधारण्यासाठी आणि कोणतेही काम अचूक होण्यासाठी आणि नवीन बदलत जाणाऱ्या तंत्रज्ञानाचा कोणत्याही क्षेत्रात उपयोग करणे अनिवार्य झाले आहे. अगदी वैद्यकीय क्षेत्रापासून ते शेती क्षेत्रापर्यंत तंत्रज्ञान वापराची गरज भासत आहे.बँकिंग क्षेत्र देखील या वस्तुस्थितीला अपवाद ठरू शकत नाही.भारतातील बँकिंग क्षेत्रात १९४० साली तंत्रज्ञानाचा वापर सुरु झाला आहे.त्यावेळेस लेझर पोष्टिंग मशीन म्हणजे या तंत्रज्ञानाच्या वापराने बँकेतील व्यवहारिक गोष्टीची पडताळणी होवू लागली.या तंत्रज्ञानाच्या वापरामुळे ग्राहकांना त्रुटी मुक्त सेवा मिळू लागल्या. हि पद्धत ग्राहकाबरोबरच बँकेला सुध्दा सोयीची होवू लागली.यामुळे पारंपारिक पद्धत वेगळी होवून अवलंब केलेल्या डिजिटल पद्धतीमुळे आणि मोबाईल वापराने फिनटेक क्रांतीला चालना मिळाली.अर्थातच बँकिंग क्षेत्रात फिनटेक चा बदलता प्रभाव समजून घेण्यासाठी "फिनटेक: बँकिंग क्षेत्रातील भरारी" या विषयावर अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे.

**संशोधन पद्धती:**

संशोधनाच्या अभ्यासासाठी पूर्णपणे दुय्यम संकलन पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे.त्यासाठी विविध वर्तमान पत्रे,पुस्तके, मासिके आणि इन्टरनेट वरील संबधित वेबसाईट इ.चा संदर्भ म्हणून वापर करण्यात आला आहे.

**संशोधनाची उद्दिष्ट्ये:**

१. बँकांची कार्यपद्धती व तंत्रज्ञानाचा अभ्यास करणे.
२. अलीकडील आधुनिक डिजिटल पेमेंट सुविधा अभ्यासणे.
३. बँकिंग आणि निओ बँक (फिनटेक) चा अभ्यास करणे.
४. फिनटेकचा आढावा घेणे.

**बँक कार्यपद्धती आणि टेक्नोलॉजी:-**

बँकिंग क्षेत्रातील पूर्वीची व्यवहार प्रक्रिया हाताने व वेळखाऊ होती. मात्र आता परिस्थिती बदलली आहे नवीन तंत्र प्रणालीमुळे निधी त्वरित हस्तांतरित करणे, बिल पेमेंट आणि खात्यातील शिल्लक तात्काळ मिळू शकते विविध संस्था API द्वारे किवा त्याची Advance Economy Managment Technology मार्फत कार्यक्षमता वाढली आहे. त्याच प्रमाणे व्यवहारातील जोखीम टाळण्यासाठी सध्या बँकेमध्ये मशीन लर्निंग अल्गोरिदम आणि एआय वापरतात

यामुळे बँकेतील व्यवहार पद्धतीचे विश्लेषण करता येते.त्यामुळे विसंगती आणि संभाव्य धोकेही टाळता येतात. संशयास्पद वाटणारे एखांदे कार्य तंत्रज्ञानामुळे लगेच निदर्शनास येते.यामुळे होणाऱ्या नुकसानीपासून बँकेला बचाव करता येतो.याचा फायदा बँकांची कार्यपद्धती सुस्थितीत राहण्यासाठी होतो व ग्राहकांना विश्वास संपादन करता येतो.

तंत्रज्ञानाची पुढील आवृत्ती म्हणजे फिनटेक. फिनटेक क्रांतीमुळे अर्थव्यवस्थेला मिळणारे बळ हे अर्थव्यवस्था वाढीवर प्रगतीच्या पाऊलखुणा उमटवणारे आहे.व्यवसाय वृद्धी आणि रोजगार निर्मिती या दोन्ही बाबतीत फिनटेक तंत्र प्रणालीचा वापर आवर्जून केला जातो. भारत हा आशिया खंडातील सर्वात मोठी बाजार पेठ म्हणून उदयास आला आहे यामुळे अर्थव्यवस्थेच्या घडामोडीच्या स्तरावर भारताने जगाचे लक्ष वेधले आहे.अमेरिकेनंतर जगातील दुसऱ्या क्रमांकाची सर्वात मोठी फिनटेक प्रणालीची क्रांती आणि त्याचा विस्तार भारतात मोठ्या प्रमाणात झालेला आढळून येतो.भारताने फिनटेक प्रणाली सुरु होण्या अगोदर अधिक खेड्यामध्ये वीज पोहोचवली नव्हती, शिक्षणाचा प्रसार इतका वाढलेला नव्हता,गरीबीचे प्रमाणही अधिक होते परंतु या फिनटेक प्रणालीच्या वापराने वेगळे चित्र बघायला मिळते.शहरी,निमशहरी भागाबरोबरच खेड्यापाडया मध्ये पायाभूत सुविधेबरोबरच यांत्रिक व तांत्रिकदृष्ट्या बदल घडत गेले.यामुळे देशाच्या प्रगतीत अडथळ निर्माण करणारे मागासलेपण हळूहळू कमी होवून नव्या तंत्रज्ञानाच्या साथीने आपला देश अर्थव्यवस्थेच्या बाबतीत विकासाची एक एक पायरी वार चढत आहे.डिजिटल प्लँटफॉर्म द्वारे आर्थिक व्यवहार प्रत्येक व्यक्ती पर्यंत अगदी दुर्गम भागातील लोकांपर्यंत पुरवण्याच आणि कामाचा ताण कमी करण्याचे कौशल्य या टेक्नोलॉजी मध्ये आहे.यामुळे कोणतीही व्यक्ती,कधीही,कुठेही आर्थिक व्यवहार करू शकते. हि सुलभता केवळ ग्राहकाचा अनुभव वाढवीत नाही तर आर्थिक साक्षरता आणि सक्षमीकरण देखील करते. आर्थिक उद्योगामुळे येणाऱ्या नवीन कार्यपद्धतीचा यामध्ये समावेश होतो.

**फिनटेक टेक्नोलॉजीचे मूल्यमापन:-**

फिनटेक टेक्नोलॉजी हे परिवर्तनीय तंत्रज्ञान आहे याच्या फायद्याबरोबरच काही बाबीमध्ये तोटेही आहेत. फिनटेकच्या जलद वाढीमुळे नियामक फ्रेमवर्क मागे पडू शकते.सायबर सुरक्षेचा विचार करता तर फिनटेक तंत्रज्ञान हे डिजिटल प्लँटफॉर्मशी संबधित असल्याने मोठ्या प्रमाणात सायबर हल्ले आणि महत्व पूर्ण डेटाचे उल्लघन होवू शकते आणि वित्तीय प्रणालीवरील विश्वास कमी होवू शकतो.फिनटेक कंपन्याद्वारे मोठ्या प्रमाणात वैयक्तिक डेटा गोपनीयतेबद्दल आणि या माहितीच्या संभाव्य गैरवापराबद्दल चिंता व्यक्त करतो.याच बरोबर ज्यांना या तंत्रज्ञानाचा वापर करणे माहित आहे किवा ज्यांना या टेक्नोलॉजी बद्दल माहिती आहे त्या लोकांना फिनटेकच्या नव्या सुविधेचा लाभ होतो पण अजूनही आपल्या देशात असा वर्ग आहे ज्यांना किमती असो किवा इतर कोणतेही डिजिटल साधने वापरता येत नाही असे ग्राहक या नवीन संधी पासून वगळले जावू शकतात.या जोखमी बरोबरच आणखी एक जोखीम डोळ्यासमोर दिसते ती म्हणजे एखाद्या फिनटेक कंपनीला मोठ्या आर्थिक अडचणीचा सामना करावा लागत असेल तर त्याचा वाईट परिणाम वित्तीय संस्थांवर देखील होतो असे काही तोटे फिनटेक टेक्नोलॉजीचे आहेत जे आपण नाकारू शकत नाहीत.

**डिजिटल पेमेंट सुविधा:-**

भारतीय अर्थव्यवस्था झपाट्याने वाढत आहे. भारत कँशलेस अर्थव्यवस्थेकडे वाटचाल करत आहे. सध्या अमेरिका व चीन नंतर भारत फिनटेक युनीकॉर्णच्या संख्येत जागतिक स्तरावर तिसऱ्या क्रमांकावर आहे. सध्या भारतात २६ फिनटेक युनीकॉर्ण आहेत गेल्या तीन दशकात भारतात फिनटेक स्टार्टअपची संख्या पाच पटीने वाढून १०,२०० झाली आहे.२०२१ मध्ये हि संख्या २,१०० होती.

देशातील आर्थिक व्यवहार व वाढती मागणी, वित्तीय सेवा मधील वाढ यामुळे फिनटेक युनीकॉर्णची संख्या २०३० पर्यंत १५० पर्यंत पोहोचू शकते. भारतातील फिनटेक व्यवहारात कार्यरत असणाऱ्या कंपन्या ज्या पेमेंट व कर्ज उपलब्ध करून देतात त्यांना जास्त प्रमाणात निधी मिळत आहे. भारताचे फिनटेक क्षेत्र पुढील ३ ते ५ दशकात ६०० अब्ज पेक्षा जास्त मालमत्ता निर्माण करू शकते. भारतात कार्यरत असनाऱ्या फिनटेक कंपन्या कोणत्या आहेत.त्या कोणकोणत्या क्षेत्रात काम करत आहेत हे लक्षात येईल.

भारतात असणाऱ्या डिजिटल पेमेंट सुविधा पुढीलप्रमाणे:-

१. **पेटीएम:-** सध्या भारतातील सर्वात मोठी डिजिटल पेमेंट सुविधा व सेवा ग्राहकांना पुरविणारी कंपनी पेटीएम आहे.या द्वारे ग्राहकांना रिचार्ज,बिल पेमेंट आणि ऑनलाईन खरेदी सारख्या सेवा देता येतात.

२. **फोन पे :-** UPI मधील एक प्रमुख प्लँटफॉर्म आहे ज्याच्या आधारे वापर कर्ते,पेमेंट,पैसे ट्रान्सफर आणि बिले भरू शकतात.

३. **गुगल पे :-** UPI आधारित पेमेंट,बिल पेमेंट आणि मनी ट्रान्सफर यासारख्या आर्थिक व्यवहारासाठी वापरले जाणारे अँप आहे याचा उपयोग दैनदिन व्यवहारासाठी प्रत्येक ग्राहक करत असतो.

४. **अँमेझॉन पे :-** ग्राहकांना ई कॉमर्स प्लँटफॉर्मसह वापर करतांना पेमेंट रिचार्ज आणि बिल भरण्याची परवानगी अँमेझॉन पे देते.

**बँकिंग आणि निओ बँक (banking and Nio bank):-**

१. **निओ बँक्स :-** निओ बँक या फिनटेक कंपन्या आहेत.ज्या बँका प्रमाणे कार्य करतात.पण या बँकांच्या कामाचे स्वरूप पूर्णपणे डिजिटल असते. अर्थव्यवस्थेत निओ बँकिंगचा प्राथमिक उद्देश कमी खर्चात अत्याधुनिक वित्तीय सेवा आणि सुविधा प्रदान करणे हा आहे. निओ बँक थेट RBI द्वारे नियमन केलेली नसते तरी देखील निओ बँकेचे बँकिंग भागीदार ICICI,HDFC आणि इतर बँका आहेत ज्या RBI कडून नोंदणीकृत आहेत आणि त्या बँका RBI च्या नियमांचे पालन करतात.

२. **ज्युपिटर (Jupitar) :-** डिजिटल पहिला अनुभव देणारी बँक म्हणजे ज्युपीटर बँक होय.खाते उघडण्याची प्रक्रिया सोपी आणि जलद आहे.या मध्ये वैयक्तिक बचत खाते उघडता येते.२०१९ मध्ये जितेंद्र गुप्ता यांनी स्थापित केलेली डिजिटल पहिला अनुभव देणारी निओ बँक आहे.निओ आणि त्यांच्या सेवा भारतात थेट नियमन केल्या जात नाहीत.ते त्यांच्या बँकिग भागीदारामुळे परिपत्रक नियमांतर्गत येतात.

३. **रेझरपे एक्स (Rezorpay x) :-** रेझरपे एक्स हे २०१३ मध्ये हर्शील माथूरने स्थापित केलेली निओ बँक आहे.ही व्यापारासाठी बनवली गेली आहे.त्यामध्ये व्यापारासाठी API आणि डॅश बोर्ड पे-आऊट प्लॅंटफॉर्म म्हणून लॉचं केला जातो. यामध्ये व्यावसायिकांचे पेमेंट,खर्च व्यवस्थापन आणि आर्थिक अंतरदृष्टी या सारख्या बँकिंग सेवा पुरवतात.

४. **निओ:-** २०१६ मध्ये विनय बागरी यांनी स्थापित केलेली असून बँकिंग अधिक स्मार्ट आणि सुरक्षित बनविणे या वाक्यासह ते आपल्या ग्राहकांना सेवा पुरवतात.यामध्ये बचत खाती,परकीय चलन आणि प्रवांशासाठी खर्च व्यवस्थापन यासह डिजिटल बँकिंग सेवा मिळते.

**गुंतवणूक आणि संपत्ती व्यवस्थापन क्षेत्र (GROWW) :-** एक कोटीहून अधिक सक्रीय ग्राहकासह भारतातील सर्वात उच्च प्रतीचे स्टॉक ब्रोकर आणि ट्रेडिंग प्लॅंटफॉर्म आहे.जिथे वापर कर्ते Mutual Fund,Stocks,U.S.Stocks,ETP,IPO आणि FOs शी संबधित गुंतवणूक उपाय शोधू शकतात.Groww हे वास्तविक पणे स्टॉक Mutual Fund चे मुल्यांकन करते.

**झिरोदा :-** भारतातील सर्वात मोठी स्टॉक ब्रोकर आणि वित्तीय सेवा देणारी कंपनी आहे. जी स्टॉक कोमोडीटीज आणि डेरीव्हेटीव्ह मध्ये किमतीत ट्रेडीग ऑफर कराते.

**अपस्टॉक्स :-** कमी ब्रोकरेज फी सह ऑनलाईन ब्रोकरेज सेवा प्रदान करणारी ट्रेडीग आहे.

**इटी मनी :-** म्युच्युअल फंड,विमा आणि खर्च व्यवस्थापन साधनामध्ये गुंतवणूक देणारी वित्त ॲप आहे.

**कर्ज आणि क्रेडीट :-**

**भारत पे :-** भारत पे हि एक फिनटेक कंपनी आहे.जी QR कोड सारखा पर्याय लहान व्यापाऱ्यांना व ग्राहकांना प्रदान करते, ज्यामुळे लाखो व्यापाऱ्यांना व्यवहार शुल्काशिवाय पेमेंट ॲप्सच्या श्रेणीवर कॅशलेस पेमेंट स्वीकारण्यास मदत होते.

**इंडीफी (Indifi) :-** हे RBI नोंदणीकृत टेक्नोलॉजी प्लॅंटफॉर्म आहे जे विविध माध्यमाद्वारे व्यवसायाच्या डेटाचे संकलन आणि विश्लेषण कराटे.त्याची क्रेडीट योग्यता, ते कार्यरत असलेल्या उद्योगाच्या संदर्भात भूतकाळातील आणि सध्याची कामगिरी तपासण्यासाठी अंतर्गत बाबींचे मुल्यांकन करते तसेच डेटा तपासणी झाल्यानंतर लहान व्यवसायांना इंडीफी तर्फे कर्ज दिले जाते.

**विमा (Insurance).**

पॉलीसी बाजार:- पॉलीसी बाजारामध्ये ग्राहकांना व्यवसाय भागीदार म्हणून कार विमा, आरोग्य विमा,जीवन विमा कार्पोरेट विमा आणि प्रवास विमा ऑफर करणारी कंपनी आहे पॉलीसी बाजार हे जीवन विमा आणि सामान्य विमा एकत्र करून त्याचे तुलनात्मक विश्लेषण करते पॉलीसी बाजार आघाडीच्या ऑनलाईन प्लॅंटफॉर्म पैकी एक आहे. पॉलीसी बाजाराशिवाय सर्वात महत्वाचे म्हणजे विमा विषयी काम करणारे डिजिटल प्लॅंटफॉर्म आहे.

**संदर्भ सूची :**


1. Kulkarni, Aditya.Auth n Capture: Introduction to India’s Digital Payments Ecosystem. Chennai Notion Press 1st Edition, 2021.
2. Phadake, Mr.Sanjay.Fintech Future: the Digital DNA of Finance.2020: sage Publication, New Delhi.
3. Mistry, Dr.Komal.Fintech in india.Atlantic Publishers, New Delhi.
4. Susanne Chishti,Jans Barberis.the Fintech book: the financial Technology Handbook for investers,1st Edition,2016.